# शालिमार पेंट्सच्या महसुलात तिसऱ्या तिमाहीत वाढ

**मुंबई :** शालिमार पेंट्स कंपनीने नुकतेच २०१८-१९ या वर्षातील तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले. असून दुसऱ्या तिमाहीतील ७२.१ कोटी रुपयांवरून तिसऱ्या तिमाहीत ७५.४ कोटींपर्यंत वाढ झाली. कंपनीने घोषित केले की मैलाचा दगड ठरणारा नाशिकचा प्रकल्प, २०१९-२० च्या पहिल्या तिमाहीमध्ये पुन्हा सुरू केला जाणार आहे. शालिमार पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सुरेंदर भाटिया म्हणाले की, ''केंद्र सरकारने २०१९-२० च्या अर्थसंकल्पात रिअल इस्टेट क्षेत्रासाठी, घर खरेदीदार आणि विकासकांसंबंधित काही सुधारणा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्याचा पेंट उद्योगालाही लक्षणीय फायदा होईल,'' असेही ते म्हणाले.